ला.प्र.वि.हिंगोली जि.हिंगोली
दिनांक :– २६.०१.२०२४

**प्रेसनोट**

**महिला सरपंचाचे पती खाजगी इसम शेकुराव नारायणराव शिंदे ,वय ७० वर्षे, व्यवसाय शेती, रा.वटकळी ता. सेनगाव जि.हिंगोली यांना ५०००/– रूपये लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक २४.०१.२०२४ रोजी तक्रार दिली होती की, ते मौजे वटकळी तालुका सेनगाव जिल्हा हिंगोली येथील रहिवासी असुन त्यांच्या वडीलांचा वटकळी ता.सेनगाव जि.हिंगोली येथील ग्रामपंचायतचा एमआरजीएस या योजनेमध्ये अहिल्यादेवी सिंचन विहीर मंजूर करण्यासाठी पात्र लाभार्थी म्हणुन ठराव मंजूर करून दिला म्हणुन त्या मंजूर ठरावाचे व सिंचन विहिरीचे पुढील कामात सहकार्य करण्यासाठी महिला सरपंच यांचे पती खाजगी इसम शेकुराव नारायणराव शिंदे ,वय ७० वर्षे रा.वटकळी ता.सेनगाव जि. हिंगोली यांनी यातील तक्रारदार यांना पंचासमक्ष ५०००/–रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक २४.०१.२०२४ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता महिला सरपंच यांचे पती खाजगी इसम शेकुराव नारायणराव शिंदे, वय ७० वर्षे रा.वटकळी यांनी तक्रारदार यांना ५०००/– रू. ची लाच स्विकारण्याची सहमती दर्शवुन दि.२५.०१.२०२४ रोजी सापळा कारवाई दरम्यान सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली असुन त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन सेनगाव जि.हिंगोली येथे गुरनं २५/२०२४ कलम ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी मा.डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परिक्षेत्र नांदेड, श्री रमेशकुमार स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड परिक्षेत्र नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके, पो.नि. श्री प्रफुल्ल अंकुशकर, पो.नि.विनायक जाधव, सपोउपनि युनुस शेख, विजय शुक्ला, पोह तानाजी मुंढे, रविद्र वरणे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, भगवान मंडलीक, गजानन पवार, राजाराम फुपाटे, मपोना योगिता अवचार, पोकॉ शिवाजी वाघ, चापोह अकबर शेख सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर परीश्रमीका व्यतीरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.–१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,
**मोबाईल क्रमांक** :– ९८७०२२१३७९

**पोलीस उप अधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली.**

CamScanner